दै. पुण्यनगरी दि. 16-10-24

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्यास शिक्षा

**नांदेड / प्रतिनिधी**

अल्पवयीन मुलीस लग्नाचे आमीष दाखवून पळून नेऊन तिच्यावर अत्याचार करणाऱ्या नराधमास १० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा आणि ३ हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठाविण्यात आली आहे.

नांदेड येथील स्पेशल पोस्को न्यायालयाचे जिल्हा न्यायाधीश रविंद्र पांडे यांनी ही शिक्षा सुनावली आहे. हुलाजी भीमराव खांदाजे (वय २६, रा. नंदनवन, ता. कंधार, हल्ली मुक्काम राजेशनगर, तरोडा नाका, नांदेड) असे आरोपीचे नाव आहे. कलम ३७६ (२) भा.द. वि. आणि कलम ३, ४ पोक्सो. अंतर्गत १० वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व दंड तीन हजार रुपये अशी शिक्षा ठोठावली. याबाबत भाग्यनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदरील गुन्ह्यामध्ये सरकारतर्फे एकूण सात साक्षीदार तपासण्यात आले. न्यायालयासमोर आलेल्या साक्षी पुराव्याचा विचार करून तसेच अतिरिक्त सरकारी अभियोक्ता श्रीमती अनुराधा कोकाटे यांचा युक्तिवाद ग्राह्य धरुन न्यायाधीश यांनी दि. १५ ऑक्टोबर रोजी वरीलप्रमाणे शिक्षा ठोठावली. सरकारतर्फे अतिरिक्त जिल्हा सरकारी अभियोक्ता श्रीमती अनुराधा कोकाटे यांनी बाजू मांडली. सदर प्रकरणात स.पो.नि. विशाल भोसले यांनी तपास पूर्ण केला. तसेच पैरवी अधिकारी पोलिस जमादार सादीक पटेल यांनी सहकार्य केले.

दै. लोकमत दि. 1 -10-24

# मुलीला पळविले; दहा वर्षांची शिक्षा

लोकमत न्यूज नेटवर्क

**नांदेड :** कंधार तालुक्यातून एका अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून पळवून नेल्यानंतर तिच्यावर अत्याचार करण्यात आला होता. या प्रकरणातील आरोपीला न्यायालयाने दहा वर्ष सश्रम कारावासाची शिक्षा ठोठावली.

हुलाजी भीमराव खांदाजे असे आरोपीचे नाव आहे. त्याने एका अल्पवयीन मुलीला प्रेमाच्या जाळ्यात ओढले होते. त्यानंतर लग्नाचे आमिष दाखवून पळवून नेत तिच्यावर अत्याचार करण्यात आला. या प्रकरणात सात साक्षीदार तपासले असून न्या. रविंद्र पांडे यांनी आरोपीला दहा वर्षाची शिक्षा ठोठावली.